# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः20.06.2024** **वारःगुरुवार**

---

1. आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त राज्यात उद्या ठिकठिकाणी योग शिबिरांचं आयोजन

2. केंद्राद्वारे 14 पिकांची किमान आधारभूत किंमत जाहीर

3. महाराष्ट्रात वाढवण इथं 76 हजार कोटी रुपये खर्चून सर्व हवामानातील बंदर बांधण्याचा निर्णय

4. पुणे शहरातील बहुचर्चित द्रुतगती वर्तुळाकार मार्गासाठी जागा आरक्षित करण्यास मंजुरी

5. मागेल त्याला शेततळे या योजनेअंतर्गत यंदा राज्यात १५ हजार शेततळी निर्माण करण्याचं उद्दिष्ट आणि

6. येरवडा कारागृहात आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ परिषदेचं आयोजन

**योग-दिवस**

दहाव्या आंतरराष्ट्रीय योग दिवसानिमित्त उद्या राज्यभरात विविध उपक्रम आणि शिबिरांचं आयोजन करण्यात आलं आहे. यावर्षीच्या योग दिवसाची मध्यवर्ती संकल्पना "स्वतःसाठी आणि समाजासाठी योग" अशी आहे.  नियमित योगाभ्यासाचे लाभ केवळ व्यक्तीपुरते मर्यादित नाहीत. समुदाय आणि सामूहिक कल्याणाची भावना यांना त्यातून प्रोत्साहन मिळतं, सामूहिक योग सत्र आणि सामुदायिक योग या कार्यक्रमांचा नित्य सराव ठेवल्याने सामाजिक संबंध आणि एकमेकांना आधार देण्याची भावना वाढीस लागते असा सल्ला योग तज्ज्ञांनी दिला आहे.

**योग दिन**

आंतरराष्ट्रीय योग दिवसानिमित्त भारतीय जनता पक्षातर्फे उत्तर मुंबईत योग कार्यक्रमाचं आयोजन केलं असून या कार्यक्रमात केंद्रीय वाणिज्य मंत्री पियुष गोयल सहभागी होणार आहेत. आंतरराष्ट्रीय योग दिवसाला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जगभर मान्यता मिळवून दिली आहे आणि याचा भारताला अभिमान वाटतो. योग उत्सव मोठ्या उत्साहात आणि मोठ्या प्रमाणात साजरा करण्याची योजना आहे असं गोयल यांनी या कार्यक्रमविषयी बोलताना सांगितलं.

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या जम्मू आणि काश्मीरमध्ये श्रीनगर इथं योग दिवसाच्या मुख्य कार्यक्रमाचा आरंभ करणार आहेत. यावेळी ते स्वतः सहभागी होऊन योगासनं करणार आहेत. या दिवसानिमित्त दिलेल्या संदेशात मोदी यांनी म्हटलं आहे की योग हा आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनवण्याच्या आपल्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार करणं आणि इतरांनाही आपल्या जीवनाचा भाग बनवण्यास प्रोत्साहित करणं महत्त्वाचं आहे. योग शांततेचं अभयारण्य प्रदान करतो, यामुळे आपल्याला जीवनातील आव्हानांना शांततेनं आणि संयमानं सामोरं जाण्यास बळ मिळतं.

**योग शिबिर**

विविध आजारांवर नियंत्रण मिळण्यासाठी तसंच सुदृढ  राहण्याकरिता योग अभ्यास आणि नियमित योगसाधना आवश्यक आहे. तरुणांनी योग अभ्यास आत्मसात करून योगाचा प्रचार करावा, असं  आवाहन माजी मुख्यमंत्री खासदार अशोक चव्हाण यांनी केलं आहे. नांदेडमध्ये आयोजित योग शिबिराच्या उद्घाटन कार्यक्रमात ते बोलत होते.

**योग दिवस पुणे**

पुण्यातील राष्ट्रीय निसर्गोपचार संस्थेद्वारे उद्या तीन ठिकाणी योगासनांची प्रात्यक्षिकं आयोजित केली आहेत. त्यामध्ये, बापू भवन, येवलेवाडी इथलं निसर्ग ग्राम आणि गोहे बुद्रुक इथलं निसर्ग साधना केंद्र समाविष्ट आहे. प्रादेशिक पासपोर्ट कार्यालय, मध्य रेल्वे, पुणे दिवाणी न्यायालय आणि आसपासच्या अनेक शाळा आणि महाविद्यालयांमध्ये देखील नंतर ही प्रात्यक्षिकं घेतली जाणार आहेत.

**CBC**

पुण्यातील केंद्रीय संचार ब्यूरो कार्यालय यंदाचा योग दिवस येरवडा कारागृहामध्ये साजरा करणार आहे. कारागृहाच्या खुल्या मैदानात होणाऱ्या या कार्यक्रमात बंदिवान जन सहभागी होणार आहेत. या कार्यक्रमामध्ये केंद्रीय संचार ब्यूरोचे विभागीय कलाकार कथक नृत्य तसंच योग गीतं सादर करणार आहेत; पुण्यातील राष्ट्रीय निसर्गोपचार संस्थेचे योग अभ्यासक आणि प्रशिक्षक उपस्थितांचा योग सराव करून घेतील.

**योगदिन**

**Intro**

धाराशिव जिल्ह्यातील कळंब इथले दृष्टिबाधित योग शिक्षक शशी कुमार भातलवंडे यांची डोळसपणे योग साधना सुरु आहे. भातलवंडे यांनी 2005 पासून योग साधनेला सुरुवात केली. आतापर्यंत त्यांनी 500 योग शिक्षकांना प्रशिक्षण दिलं असून दोन लाख विद्यार्थ्यांना शाळांमध्ये जाऊन विशेष योग शिबिरांद्वारे प्रशिक्षण त्यांनी दिलं आहे. त्यांच्या कार्याविषयी माहिती देणारा हा वृत्तांत...

Script

स्वतः प्रज्ञाचक्षू असून देखील त्यांच्या योगसाधनेमध्ये त्यांनी सातत्य  ठेवले आहे. या योग साधनेमुळे त्यांना अनेक पुरस्कार देखील मिळाले आहेत.2012 सालचा धाराशिव येथील लोकसेवा समितीच्या वतीने भारतरत्न माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त दिला जाणारा लोकसेवा पुरस्कार, तसंच 2019 मध्ये कळंब भूषण पुरस्काराने ते सन्मानित आहेत. 2017 मध्ये जीवनगौरव पुरस्कारही त्यांना मिळाला आहे. 2010 मध्ये प्रोग्रेसिव्ह चॅरिटेबल ट्रस्ट तर्फे ही त्यांचा सत्कार झाला आहे . व्यसनमुक्ती ,रोगमुक्ती यासाठी योगाभ्यासातून समुपदेशनाचे कामही ते करतात. मागील वीस वर्षांपासून निशुल्क योग प्रशिक्षण देणाऱ्या या प्रज्ञाचक्षू अंध योग शिक्षकाने अनेकांना योग शिकवला असून प्रत्येकाच्या आयुष्यात योगामुळे शारीरिक आणि मानसिक सुदृढता येऊन योगाची ही भारतीय परंपरा जपली आहे. आणि इतरांपर्यंत पोहोचवण्याचं कार्य सुरू ठेवल आहे. ही योगसाधना प्रत्येकाला आपल्या दैनंदिन दिनचर्येमध्ये योग साधना करण्याची प्रेरणा देत आहे. देविदास पाठक, आकाशवाणी वार्ताहर, धाराशिव.

**आधारभूत**

केंद्र सरकारनं 14 खरीप पिकांसाठी 2024-25 च्या विपणन हंगामाकरिता किमान आधारभूत किंमत वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्रातील वाढवण बंदर विकसित करण्याचा आणि गुजरात आणि तामिळनाडूमध्ये पहिला ऑफशोअर विंड टर्मिनल विकसित करण्याचाही निर्णय सरकारनं घेतला आहे. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिल्ली इथं बातमीदारांना या निर्णयांची माहिती देताना सांगितलं की, भात, कापूस, बाजरी, कडधान्यं, तेलबिया यांच्या आधारभूत किंमतीमध्ये लक्षणीय वाढ झाल्यानं शेतकऱ्यांना लाभ होईल. महाराष्ट्रातील वाढवण इथं सर्व हवामानातील हरितक्षेत्र बंदराच्या उभारणीसाठी 76 हजार कोटी रुपयांहून अधिक खर्च येणार असून पूर्ण झाल्यानंतर ते जगातील पहिल्या 10 बंदरांपैकी एक होईल असं वैष्णव म्हणाले. हे बंदर दोन टप्प्यात विकसित केलं जाईल आणि त्याची क्षमता 20 फूट लांबीचे 23 दशलक्ष कंटेनर हाताळण्याची असेल. या बंदरामुळे येत्या काही वर्षांत सुमारे 12 लाख रोजगाराच्या संधी निर्माण होण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली.

**शेततळे**

मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजनेतून मागेल त्याला शेततळे या योजनेअंतर्गत या आर्थिक वर्षात राज्यात १५ हजार शेततळी निर्माण करण्याचं उद्दिष्ट निश्चित करण्यात आलं आहे. त्यासाठी राज्य सरकारन १०० कोटी रूपये अनुदान मंजूर केलं असल्याची माहिती पुणे कृषी विभागाचे मृदसंधारण आणि पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन संचालक रवींद्र भोसले यांनी दिली आहे. पुणे विभागानं जिल्हानिहाय शेततळ्यांचं उद्दिष्ट  निश्चित केलं असून शेतक-यांकडून महाडीबीटी यंत्रणेतून ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

**पुणे-वर्तुळमार्ग**

पुणे शहरातील वाहतुक कोंडी कमी  करण्यासाठी  बहुचर्चीत एच सी एम टी आर अर्थात उच्च क्षमता द्रुतगती वर्तुळाकार मार्गासाठी जागा आरक्षित करण्यास मंजुरी देउन त्याबाबतची अधिसूचना राज्याच्या नगरविकास विभागानं काढली आहे.  संपूर्ण उन्नत असणारा सुमारे 36 किलोमीटर लांबीचा हा रस्ता  आहे.  या रस्त्याची रुंदी  २४ मीटर  असेल आणि वाहनांची वेगमर्यादा ५० किलोमीटर प्रति तास निश्चित करण्यात आली आहे. पुणे शहराच्या १९८७ च्या विकास  आराखडयात हा मार्ग प्रस्तावित करण्यात आला होता.  त्यानंतर २० वर्षानी म्हणजे २०१७ मध्ये मंजूर  आराखड्यात ३६ किलोमीटर लांबीचा आणि २४ मीटर रुंदीचा हा मार्ग दाखविण्यात आला आहे.

**मिफ**

अठराव्या मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात काल पाचव्या दिवशी  मुंबईत राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठीच्या चित्रपटांचं परीक्षण केलेल्या परीक्षकांनी वार्ताहरांशी संवाद साधला. राष्ट्रीय स्पर्धेत अपूर्वा बक्षी यांच्या नेतृत्वातल्या पाच जणांच्या परीक्षक मंडळानं माहितीपट, ॲनिमेशन आणि शॉर्ट फिक्शन अशा एकंदर ७७ चित्रपटांचं परीक्षण केलं. या मंडळात ॲना हेनकेल, ॲडेल सीलमन, डॉ. बॉबी सर्मा बरुआ आणि मुंजाल श्रॉफ यांचाही समावेश होता.

**सुनेत्रा पवार**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सुनेत्रा पवार यांची राज्यसभा सदस्य म्हणून निवड झाल्याची घोषणा महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे सचिव तथा निवडणूक निर्णय अधिकारी जितेंद्र भोळे यांनी केली आहे. राज्यसभा सदस्य प्रफुल्ल पटेल यांच्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या या जागेसाठी पोटनिवडणूक जाहीर करण्यात आली होती.

**कृषी  सेवा केंद्र**

वाशिम जिल्ह्यातील 14 कृषी केंद्रांवर गैरप्रकार केल्याबद्दल कारवाई करण्यात आली. बुलडाणा जिल्ह्यातील 118 कृषी केंद्रांचे परवाने रद्द करण्यात आले तर 207 कृषी केंद्रांना खत आणि बियाणे विक्री करण्यास प्रतिबंध करण्यात आला. सातारा जिल्ह्यात देखील १५ विक्री केंद्रावर परवाना निलंबनाची कारवाई तर ५ केंद्रांचे परवाने रद्द करण्यात आले आहेत.

**दिव्यांग शिक्षक**

दिव्यांग विद्यार्थ्यांमध्ये न्यूनगंडाची भावना येऊ न देता शिकवणं जिकिरीचं काम आहे. राज्यातील दृष्टीहीन आणि दिव्यांग शिक्षकांच्या समायोजनासाठी शासन सकारात्मक असून याबाबतचा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर आणावा, असे निर्देश उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल दिले. राष्ट्रीय दृष्टीहीन संघ, महाराष्ट्र शाखेनं दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगानं घेतलेल्या बैठकीत ते काल मुंबईत बोलत होते.

**बुद्धिबळ** स्पर्धा

आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ संघटना आणि इंडीयन ऑईल यांच्याद्वारे पुण्यातील येरवडा मध्यवर्ती कारागृहत दुसऱ्या चेस फॉर फ्रीडम या आंतरराष्ट्रीय परिषदेचं आयोजन करण्यात आल आहे. याद्वारे राज्यातील प्रत्येक कारागृहातून बुद्धिबळ खेळणारे संघ तयार करण्यासह महिला बंदिवानांचा सहभाग वाढविण्यावर भर देण्यात येणार असल्याचं कारागृह विभागाचे अपर

पोलीस महासंचालक अमिताभ गुप्ता यांनी उद्घाटन कार्यक्रमात सांगितलं.  येरवडा कारागृहात बंदिवानांसाठी बुद्धिबळ खेळास सुरुवात केल्यानंतर एका वर्षातच आंतरराष्ट्रीय परिषदेचं आयोजन करण्यात आलं असल्याचं गुप्ता यांनी नमूद केलं. बाहेर सर्व सुविधा असणाऱ्या खेळाडूंना जे जमणार नाही ते या कारागृहातील कैदी खेळाडूंनी करून दाखविलं अशा शब्दांत गुप्ता यांनी बंदिवान खेळाडूंचं कौतुक केलं आहे.  सध्या येरवडा कारागृहात महिला आणि पुरूष असे २०० कैदी बुद्धिबळ शिकत आहेत.

**हवामान**

कोकण आणि मध्य महाराष्ट्राच्या घाट परिसरात आज जोरदार ते अति जोरदार पावसाचा तर विदर्भात वीजा आणि जोराचे वारे यांच्यासह पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.